# छात्र प्रबोधन

सौर चैत्र, शके १९४५ । वर्ष २३ अंक ७।
(प्रारंभापासूनचा अंक क्रमांक – वर्ष ३१ अंक ९)
वार्षिक वर्गणी ₹ २५०। मूल्य ₹ २५। पृष्ठे ३६

## वासंतिक विशेषांक

ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी,
कृतिशीलता जोपासणारे मासिक!





# या माझ्या भारतदेशी

एकजीव उमदे व्हावे जनजीवन गावोगावी
या माझ्या भारतदेशी सुखस्वप्ने फुलुनी यावी ।। ध्रु. ।।

शेतात कोरड्या किसान गाळी घाम
पेरले उगवता हरखुन जाई भान
भरगच्च पिकाने पिवळे होई रान
बळिराजाची परि बाजारी धुळदाण
या भारतभूपुत्राच्या कष्टाला किंमत यावी ।। १ ।।

ही सागरवेष्टित भूमी सुजला सुफला
रखरखीत झाली ओलावा ओसरला
बोडके नागडे होता डोंगरमाथे
आटले झरे अन् सुकलेले पाणोठे
या सुकलेल्या रानात रुजवू या जीवनराई ।। २ ।।

गावात भांडती भाउबंद शेजारी
हे लोक निरक्षर कर्जाने आजारी
भाबडे भोळसट व्यसनांनी बेभान
मागास रिकामे शहरांचेच गुलाम
या गावकऱ्यांच्या गावी नवनवी उभारी यावी ।। ३ ।।

कान्ह्याच्या गावी भरले गोकुळ होते
गोपांच्या मेळी गोवर्धनबळ होते
कालिया पूतना कंस संपले सारे
यमुनेच्या काठी स्वातंत्र्याचे वारे
हरिकथा अवतरो हीच माझिया गावी ।। ४ ।। – राम डिंबळे

या पद्याची
चाल ऐका
आणि पद्य म्हणा!

**पद्याचा भावार्थ :** आपला भारत देश हा अनेक खेड्यांनी युक्त असा शेतीप्रधान देश आहे. दुष्काळासारख्या नैसर्गिक आपत्ती, अज्ञानामुळे शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक, कर्जबाजारीपणा, व्यसनाधीनता यांनी ग्रासलेले असे हे ग्रामजीवन! आज स्वातंत्र्य मिळून ७० वर्षे होत आली तरी हे विदारक चित्र पूर्णत: बदललेले नाही. ते आमूलाग्र बदलण्याचे स्वप्न कवीने या पद्यातून उभे केले आहे. अर्थात ते स्वप्न सत्यात येण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करायला हवेत, हा संदेश नकळत कवी आपल्याला देतो आहे.

# हिरवे सदन

– डॉ. सुमन नवलकर

कथा



सकाळपासून निर्मल वाट पाहात होता, ती संध्याकाळी होणाऱ्या अखिलच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमाची. वाढदिवसाची भेट म्हणून निर्मलने अखिलला आवडेल असा खेळ आणला होता. तो पाहून अखिल खूश होईल, अशी खात्री त्याला वाटत होती; पण सगळ्यात जास्त वाट पाहाणं होतं, ते अखिल त्याच्या वाढदिवसाचं मित्रमंडळींना काय देतो याचं! आईला तर तो म्हणालाही, ''आज अखिल आम्हाला *रिटर्न गिफ्ट* काय देणार आहे कोण जाणे!''

''निर्मल, अरे तुला काय हवं असेल ते आणतोच ना आम्ही तुझ्यासाठी?'' आई वैतागून म्हणाली.

छान रंगीत कागदात गुंडाळून वर *रीबनचा बो* बांधून कोणी दिलेली भेटवस्तू उघडून आत काय आहे, ते पाहाण्यात किती गंमत असते ते तर आईलाही माहीत आहेच की!

पण अखिलच्या वाढदिवसाहून निर्मल आला ते फुस्स झालेलं, कोमेजलेलं तोंड घेऊन. मुख्य म्हणजे दरवाजाची घंटी न वाजवता त्याने दाराची कडी का वाजवावी, असा विचार करतच आईने दार उघडलं; पण मग तिचं लक्ष निर्मलच्या हातांतल्या छोट्याशा कुंडीकडे गेलं. कुंडीत छोटंसं, छानसं, हिरवंगार तुळशीचं रोप होतं. दोन्ही हातांत कुंडी पकडलेली असल्यामुळे निर्मलला कोपराने कडी वाजवावी लागली होती.

आईने पटकन पुढे होऊन निर्मलच्या हातांतून कुंडी घेतली आणि म्हणाली, ''अरे वा!''

''अरे वा, कसलं? ही काय लहान मुलांना द्यायची भेटवस्तू आहे?'' निर्मल फुणफुणला.

''लहान? अरे, तू तर नेहमी म्हणतोस ना की, मी आता मोठा झालोय. आताच एकदम लहान कसा झालास?'' आईचं चिडवणं ऐकून निर्मल आणखीच चिडला.

''आधीच आम्हाला सर्वांना वाईट वाटतंय. त्यातून अजून चिडव मला! कोणाला म्हणजे कोणालाच आवडली नाहीये ही भेटवस्तू. आणि वर अखिलची आई म्हणाली, 'सर्वांनी आपापल्या *गॅलरीत* ठेवा. रोज पाणी घाला. पाहू या कोणाच्या तुळशीला सर्वात आधी मंजिऱ्या येतात ते'!''

आई हसली. म्हणाली,

''चल, आपण *गॅलरीत* ठेवू आणि तू पाणी घाल. तुला भेट मिळालेली तुळस आहे ना ही?''

मग तुळशीला नावच पडलं, 'निर्मलची तुळस.' आईच्या मागून *गॅलरीत* जाताना निर्मलने तांब्याभर पाणी घेतलं. कुंडी जमिनीवर ठेवताना आईने तांब्या पाहून म्हटलं, ''इतकं पाणी नाही घालायचं निर्मल. तुळशीचं बाळ आहे ना ते?'' आई मग छोटी वाटी पाण्याने भरून घेऊन आली. हलक्या हातांनी पाणी कुंडीत ओतत म्हणाली, ''आता त्या तांब्यातलं पाणी ओंजळीत घेऊन पानांवर शिंपड. बस, इतकंच पाणी घालायचं हं!''

प्रत्येकाच्या घरात त्यांची-त्यांची रोपं वाढत होती. मग अक्षताचा वाढदिवस आला. आता इतकी छान भेटवस्तूची कल्पना म्हटल्यावर, बाकी मुलांचे पालक ती उचलून धरणारच ना? अक्षताच्या आईनं सर्वांसाठी शेवंतीची रोपं आणली होती. इथे तर रोपांचंही रहस्यच होतं. पांढरी शेवंती, पिवळी शेवंती, मसाला शेवंती, बटण शेवंती अशी वेगवेगळ्या प्रकारच्या शेवंतीची रोपं होती.



कोणाच्या रोपाला सर्वात आधी फूल येतंय आणि कोणत्या रंगाचं-ढंगाचं फूल पहिल्यांदा येतंय अशी दुहेरी उत्कंठा होती. एव्हाना मुलांनाही हळूहळू या रोपांच्या जगाची गंमत वाटायला लागली होती. दहा जणांच्या या चमूकडे वर्षाच्या शेवटी प्रत्येकी दहा- दहा कुंड्या झाल्या होत्या. सर्वांच्याच घरी निर्मलची रोपं, अखिलची रोपं, अक्षताची रोपं अशी रोपांची नावं ठेवून, पालकांनी रोपांच्या सेवेचं काम आपापल्या मुलांवर सोपवून टाकलं होतं. सर्वात आधी मृण्मयीच्या तुळशीला मंजिऱ्या आल्या. मंजिऱ्या कशा असतात ते पाहायला मग मृण्मयीच्या *गॅलरीत* मुलांनी हीऽऽऽऽ गर्दी केली. छोटेसे तुरे, त्यातून डोकावणारी जांभळट रंगाची फुलं पाहायला किती मजा वाटली मुलांना.

मग मानसच्या गुलबक्षीला फुलं आली. मग राधिकाच्या अबोलीला तुरा आला. त्यातून छान अबोली रंगाच्या कळ्या डोकावल्या. त्यांची हळूहळू फुलं व्हायला लागली. मधेच एकदा छान वाढत असलेलं पारसचं तुळशीचं रोप चिमणीने जमीनदोस्त करून टाकलं. पारसचा हिरमुसलेला चेहरा

**जाणून घ्या : एकमरा कानन बोटॅनिकल गार्डन (ओडिशा)** - हे सर्वात मोठे गार्डन असून संशोधन संस्थेचा एक भाग आहे.

पाहून नंदिनी म्हणाली, ''अरे, माझ्या कुंडीत पहिल्यापासूनच दोन रोपं आहेत. चल, एक रोप देते तुला.'' मग पारस कुंडी घेऊनच गेला नंदिनीकडे. नंदिनीच्या आईने हलक्या हाताने एक रोप नंदिनीच्या कुंडीतून काढून पारसच्या कुंडीत लावलं.

''देण्याचा आनंद किती मोठा असतो ना?'' नंदिनीची आई पारस गेल्यावर नंदिनीला म्हणाली. नंदिनीने मान डोलावली. पारसचा हिरमुसलेला चेहरा खुललेला पाहून पटलंच होतं तिला ते.

सर्वात वेगाने वाढत होती, ती मदनबाणाची रोपं. पाहाता-पाहाता त्या छोट्या कुंड्या त्यांना पुरेनाशा झाल्या होत्या. मोठ्या कुंड्या आणून त्यात ती रोपं लावली जात होती. मग छोट्या कुंड्यांमधे गुलबक्षीच्या बिया, तुळशीच्या बिया असं पेरलं जात होतं.

''मध्यंतरी आजीला खूप खोकला झाला होता. मग आई तिला गवती चहाची पाती घालून चहा करून देत होती. त्यात आई माझ्या तुळशीची चार पानंही घालत होती. आता खूप कमी झालाय तिचा खोकला. काहीही म्हण, तुळशीची रोपं देण्याची तुझ्या आईची कल्पनाच एकदम भारी,'' निर्मल अखिलला म्हणाला.

''हो, पण तेव्हा सगळ्यानाच 'फुस्स' वाटलं होतं, रोपं दिलेली पाहून!'' मृण्मयीने आठवण करून दिली. मुलांना आठवतच होतं ते. सगळ्यांच्या माना डोलल्या.

सगळ्यात आधी मदनबाणाचं फूल आलं ते सलोनीच्या रोपाला. केव्हापासून कळी आली होती. मोठी-मोठी होत होती. एकदाचं फूल उमललं; पण उमललं ते रात्री. सकाळी सलोनी रोपांना पाणी घालायला गेली, तर *गॅलरीत* घमघमाट. गंमत म्हणजे रविवारच होता. मग काय! झाली फोना-फोनी. अख्खी टोळी सलोनीच्या *गॅलरीत* जमली. जो-तो आपला फुलाला नाक लावून बघतोय.

''हा! काय सुंदर वास!''

''वा! काय मस्त वाटलं!''

''किती भन्नाट वास आहे रे!''

*''वॉव! ग्रेट!''* अशा अनेक उद्गारांनी *गॅलरी* दुमदुमली. सर्वांच्याच घरी मदनबाण जरा जास्तच भरभर वाढत होता.

''आम्ही सगळेच चाललोय मावशीच्या लग्नासाठी. आता रोपांना पाणी कोण घालेल?'' स्वराला प्रश्न पडला. मग प्रत्येकाने तिची एकेक कुंडी आपापल्या घरी पाहुणी म्हणून नेली. प्रश्न सुटला. मग लग्नाहून आल्यावर स्वराच्या कुंड्या स्वराकडे परत आल्या. सगळं गुण्या-गोविंदाने चाललं होतं. मग 'आनंद सदन'च्या वाड्यात भिंतीला लागून छान विटांचा छोटासा बांध घालून, मुलांनी घरात मोठी होत चाललेली झाडं खाली वाड्यात खड्डे खणून लावली. वाड्यातही बाग बहरू लागली. रोज संध्याकाळी खेळायला जाताना एकेक बाटली भरून पाणी प्रत्येकाने आणायचं. कोणी कुठल्या झाडांना पाणी घालायचं, हेही आपापसात ठरवून घेऊन, त्याप्रमाणे सगळं सुरळीत पार पडू लागलं. जास्वंद, कढीलिंब, ओवा अशी मोठी होणारी झाडं कुंड्यांमधून जमिनीत उतरून मोकळा श्वास घेऊ लागली. आधीच 'आनंद सदन'च्या भोवती चार सोनमोहोराचे वृक्ष वर्षानुवर्षं आहेत. आता या वृक्षांच्या छायेत मुलांची ही झाडं मजेत डोलू लागली.

फोडणीला कढीलिंबाची पानं, गणपतीला जास्वंदीची फुलं, *सेल्फी* काढावेसे वाटले,

पुस्तकांची जागा आता नवीन गॅजेट्सने घेतली। अप्रतिम पुस्तकांवर आता गड्या धूळ बसू लागली।।

वार्षिक देणगीदार - ➢ श्री. सचिन गाडगीळ, पुणे ➢ श्री. श्रीकृष्ण करंदीकर, कॅलिफोर्निया, अमेरिका
➢ श्री. समीर गांधी, बेंगळुरु ➢ श्री. अजय फाटक, पुणे ➢ श्री. अरविंद परांजपे, पुणे

तर *सेल्फी कॉर्नर*, कोणाला केसांत माळावंसं वाटलं तर गुलाबाचं फूल, कोणाकडच्या बाळाला खोकला झाला तर कोरफडीचा रस. अशा सगळ्यांच्या गरजा कुंपणाच्या आतली छोटेखानी बाग पुरवू लागली. आनंद-सदनमधे आनंदी-आनंद पसरू लागला. दिवसा फुलपाखरं बागडू लागली. पहाटे-पहाटे कोकीळ गाऊ लागला. बुलबुल तुरे नाचवत उडू लागले.



आज पुन्हा अखिलचा वाढदिवस होता. सर्वांना काळजी वाटू लागली की, आता अकरावं रोप घरात येतंय की काय? कारण सर्वांच्या *गॅलऱ्या* आता कुंड्यांनी भरून गेल्यात. छोट्या कुंड्यांच्या जागी मोठ्या कुंड्या आल्यात. छोट्या कुंड्यांत छोटी-छोटी रोपं लावून नातलगांना, *ऑफीसांतल्या* मित्र-मैत्रिणींना, शाळा-*कॉलेजांतल्या* कंपूंमधे भेट म्हणून दिली जात आहेत.

'आनंद-सदन' तर हिरवंगार झालं आहेच; पण हळूहळू इतर इमारतींमध्ये, इतर परिचयाच्या माणसांमध्ये हिरव्या रंगाची देवघेव होऊ लागली.

अखिलकडे सगळे जमले. केक कापला. केक आणि अखिलच्या आईने केलेला खाऊ खाल्ला. घरी परतायची वेळ झाली. आतून छोट्या-छोट्या पिशव्या घेऊन अखिलची आई आली. म्हणाली, ''घाबरू नका. आता अकरावी कुंडी ठेवायला कोणाच्याही *गॅलरीत* जागा नाही, हे ठाऊक आहे मला. त्यामुळे असं काहीही तुम्हाला दिलेलं नाही.'' मुलंच ती! त्यांना थोडाच धीर निघणार आहे आपापल्या घरी पोहोचेपर्यंत? अखिलने हातात पिशव्या दिल्या तशा सर्वांच्या माना पिशव्यांत डोकावल्या. पिशवीत एकेक छोटीशी झारी आणि एकेक छोटीशी खुरपणी होती. कोणाची हिरवी, कोणाची निळी, कोणाची पिवळी, कोणाची लाल. त्यांवर निरनिराळे फुलांचे-पक्ष्यांचे *स्टिकर* होते. या वेळी कोणालाही वाईट वाटलं नाही की, खेळाऐवजी हे काय दिलंय अखिलच्या आईने भेट म्हणून! ''आता या झारीने पाणी घालायचं झाडांना आणि या खुरपणीने कुंडीत घट्ट झालेली माती सैल करायची.''

**जाणून घ्या :** हैदराबाद बोटॅनिकल गार्डन (तेलंगणा) – या गार्डनमध्ये लुप्तप्राय प्रजातींचे संवर्धन व प्रसारासाठी प्रयत्न केला जातो.

वार्षिक देणगीदार - ➢ सौ. शशिकला उपाध्ये, चंद्रकला प्रकाशन, पुणे ➢ डॉ. गीतांजली व डॉ. सिद्धार्थ पटवर्धन, शेफिल्ड, यु.के. ➢ सौ. सुनिता जयंत देगावकर, पुणे ➢ एक हितचिंतक, पुणे ➢ सौ. नंदिता गाडगीळ, पुणे

मुलं हल्ली घरातल्या झाडांना तर या झारीने पाणी घालतातच; पण खेळायला जाताना बाटली ऐवजी झारीतूनच पाणी घेऊन जातात. आता कोणाच्या वाढदिवसाला झाडांवरची कीड मारण्यासाठी कडुलिंबाचं तेल, तर कोणाच्या वाढदिवसाला सुकलेल्या फांद्या कापण्यासाठी झाडांची कातर, तर कोणाच्या वाढदिवसाला मातीची पाकिटं, खत असं काय-काय दिलं जातं. हल्ली मुलांनाही असल्या भेटवस्तू पाहून फुस्स वाटत नाही. सर्वांचंच आपापल्या घरातल्या आणि वाड्यातल्या बागेवर प्रेम जडलं होतं. बागेची काळजी घेण्यासाठी मुलांना जितकं काय-काय मिळेल, तितकं हवंच होतं.

लवकरच दुसरं वर्षही संपेल. रोपांसाठी देण्याच्या वस्तूंची संख्या आणि मागणी दोन्ही संपेल. मग तिसऱ्या वर्षी काय बरं घ्यायचं मुलांच्या मित्र-मैत्रिणींना; असा आता मुलांच्या आयांना प्रश्न पडलाय. मुलं मात्र खूश आहेत. आया जे काही आणतील ते मुलांच्या रोपांसाठी चांगलंच असेल, एवढं नक्की.

आता अजूबाजूच्या इमारतींतून लोकं रोपं मागायला येतात आणि सुरक्षा-रक्षकाकडून वाड्यातल्या बागेतली रोपं मोफत घेऊन जातात. सुरक्षा-रक्षकाने तर आपल्या घरीही छान बाग केलीये.

'आनंद-सदन'ला हल्ली गल्लीतले लोक 'हिरवे सदन' म्हणून ओळखतात. योग्यच आहे ना हे नाव...!


❁❁


**- डॉ. सुमन नवलकर**
ए-२०, ज्योती बिल्डिंग. प्लॉट नं.४३/४५, बरकत अली दर्गा मार्ग, वडाळा ( पूर्व), मुंबई 400037

**नक्की ऐका**
**कथा - खरी श्रीमंती**
**लेखिका - अरुणा ढेरे**
**वाचनस्वर - अदिती देवळणकर**

## कलेतली प्रयोगशीलता

निसर्गातील फुलं-पानं यांचा अभ्यास करण्यासाठी त्यांचा संग्रह केला तर खजिनाच तयार होईल. प्रत्येक फुलापानांची विविधता, त्यातलं सौंदर्य, आकारांचा व रंगांचा अभ्यास करताना काही नवीन सुचत जातं व आकारांशी मैत्री होते. उदा. खाली दिलेल्या पिंपळाच्या पानाच्या आकारातून पक्षी, कासव, मासा, मोर, नाग असे वेगवेगळे आकार सुचत गेले. याशिवाय आपली विचारशक्ती लढवून निरनिराळ्या पानाफुलांपासून विविध चित्रे तयार करणे म्हणजे बुद्धीला खुराक असतो.






वार्षिक देणगीदार - ➢ सौ. प्राची व श्री. शंतनू पटवर्धन, ह्युस्टन, टेक्सास, अमेरिका ➢ ॲसेंट हॉस्पिटॅलिटी प्रा. लि., पुणे
➢ श्री. विश्वासराव कचरे, तेलंगवाडी, ता. मोहोळ, जि. सोलापूर ➢ श्री. प्रमोद सी. पेठे, पुणे



कविता

# निसर्गातल्या गोष्टी

निसर्गातल्या गंमत गोष्टी, कराल त्यांची दोस्ती
उघडुन डोळे पहाल, तर लाभेल नवीनच दृष्टी।।

छोट्या गोष्टीमधुनी देतो, निसर्ग जो संदेश
सीमा नाहीत त्याला कुठल्या, देश असो की विदेश।।

सौरशक्तिची गावी गाथा, वाचविते जी वीज
मी ही आहे साथ द्यावया, म्हणते सागरगाज।।

वाऱ्याची तर बात निराळी, रूपे विविध अनेक
खनन, वहन अन् संचयनाचे, कार्य करी तो एक।।

वृक्ष, वेली अन् झाडे झुडुपे, हिरवी राने वदती
देण्याचा तर वसाच अमुचा, घेण्याची ना वृत्ती।।

रौद्र रूपही दावित असतो, निसर्गराजा जेव्हा
क्रुद्ध व्हावया आपण असतो, कारण त्याचे तेव्हा।।

अपुल्यासाठी असते दात्री, मातेसम हो सृष्टी
वाचवाल जर पर्यावरणा, होई सुखाची वृष्टी।।

माया-ममता हृदयी रुजवा, निसर्ग सांगे बाप्पा
जन्म-मृत्युच्या आवर्तनाचा, प्रवास होतो सोप्पा।।

**– डॉ. संगीता गोडबोले**
२०३/२०४, क्रिएटिव्ह टावर्स, ए विंग, लालचौकी,
कल्याण (प.), जि. ठाणे 421301

## हसा हसा...

**रुग्ण** : डॉक्टरसाहेब, किती दिवस झाले पण माझा आजार काही बरा होत नाही. काहीतरी चांगले औषध द्या.

**डॉक्टर** : त्यासाठी तुम्हाला तुमचे विचार बदलावे लागतील. मनामध्ये असा विचार करायचा की, आपण आता बरे होत आहोत! आजार आपोआप बरा होईल.
(डॉक्टरांचे हे उत्तर ऐकून रुग्ण उठून घरी जाऊ लागला.)

**डॉक्टर** : अरे! माझी फी तर देऊन जा!!!

**रुग्ण** : तुम्ही पण असाच मनात विचार करा की, तुम्हाला तुमची फी मिळाली!

**जाणून घ्या : पंजाब युनिव्हर्सिटी बोटॅनिकल गार्डन (चंदीगढ)** – या गार्डनमध्ये नामशेष वनस्पतींचे संवर्धन केले जाते.

वार्षिक देणगीदार - ➢ श्री. कौस्तुभ माणिकराम हळबे, ह्युस्टन, टेक्सास, अमेरिका ➢ सौ. चारुशीला व श्री. शरद केशव आवटे, पुणे
➢ श्री. हृषिकेश भागवत, बंगळुरु ➢ श्री. राजेंद्र जाधव, पुणे ➢ डॉ. जयेश रहाळकर, पुणे



# वसंताची चाहूल

– प्रसाद सांडभोर

उत्तर इंग्लंडमधल्या यॉर्कशर परगण्यातला हिवाळा म्हणजे गोठवणाऱ्या थंड रात्री आणि अंधारे, ढगाळ दिवस! असे उदासवाणे वातावरण सवयीचे होत असतानाच, अचानक कोवळ्या उन्हाच्या उजेडात नजरेस पडतात, ती जागोजागी अवतरलेली रानफुले–स्नोड्रॉप्स. दरवर्षी न चुकता मार्च महिन्यात ही पांढरीशुभ्र फुलं उमलतात आणि वाऱ्यावर डोलत दवंडी पिटतात 'वसंत ऋतू येत आहे...'

या फुलांच्या बहरण्याच्या निमित्ताने वसंताचं स्वागत करणारा हा छोटेखानी ललित लेख वाचू या!


---

दार उघडताच कोवळा प्रकाश अंगावर पडला आणि हायसं वाटलं. आभाळलेल्या सलग तीन दिवसांनंतर आज उजाडलेल्या सूर्याचे मी मनोमन आभार मानले. कानटोपी, *मफलर*, हातमोजे, *कोट* अशा पुरेपूर बंदोबस्तातही जाणवत असलेली बोचरी थंडी सात अंश तापमानाची ग्वाही देत होती. सूर्यप्रकाशाची लागलेली हजेरी मात्र मेंदूला ऊबेच्या आशेत भुलवत होती.

'अजून फक्त दोन महिने, मग ऊनच ऊन!' स्वतःच स्वतःची समजूत काढत मी सायकलवर टांग मारली. मुख्य रस्ता ओलांडला. दुतर्फा पर्णहीन झाडोरा असलेली वाट सुरू झाली. रॉबिन, गोल्डफिंच, ब्लॅकबर्ड आदी मंडळींची लयदार गाणी कानावर पडू लागली. त्यात अधूनमधून तळ्याकाठच्या हंसांच्या केकावलीची भर पडत होती. हेसलिंग्टन सभागृहानंतर डावं वळण घेतलं, तसं चर्चचं आवार लागलं. पानं गळालेल्या ओकवृक्षांची राखाडी खोडं चर्चच्या दगडी भिंतींमध्ये एकजीव झाल्यासारखी भासत होती. त्यांच्या लांबच लांब पसरलेल्या काटेरी सावल्या कुंपणालगतच्या थडग्यांवर जाळीदार नक्षीकाम करत होत्या. अचानक वाऱ्याचा

एक थंड झोत आला. ऊन-सावलीची जाळी विस्कटली. थडग्यांच्या पायथ्याशी साचलेला पाचोळा उडाला आणि त्या खालचा हिरवा-पांढरा गालिचा माझ्या नजरेत भरला. *स्नोड्रॉप्स!* गवतासारखी लुसलुशीत गडद हिरवी पाती, त्यावर लगडलेली पांढरीशुभ्र लहानखुरी झुंबर-फुलं!

'वा!' आनंदच आनंद आणि सोबत अचंबाही...! 'आजच उगवली की काय ही? काल-परवापर्यंत कुठे लपली होती? अजिबात कशी दिसली नाहीत ही फुलं? की आपलंच लक्ष नव्हतं? सायकल थांबवू? वेळ आहे?' मी हातमोज्याची कड सरकवून घड्याळ पाहिलं. पाच मिनिटांत पोहोचणं गरजेचं होतं. मनाविरुद्ध *पायडल* मारलं आणि *ऑफिस* गाठलं. *मीटिंग* संपताच *ग्रुपवर मेसेज* लिहिला, *''स्नोड्रॉप्स आर हिअर!* तुम्ही पाहिलीत का? सकाळी येताना चर्चपाशी दिसली मला; पण *फोटो* काढायला वेळ नव्हता.'' *''येस्स!* मीही पाहिली येताना; पण थांबू शकले नाही,'' लागलीच फ्रँचेस्काचं उत्तर आलं. थोड्या वेळानं हसऱ्या *इमोजीसह* क्रिस्टिनाचा *मेसेज* आला, *''स्प्रिंग इज कमिंग!''*



त्यावर कार्लोसनं लिहिलं, ''म्हणजे आता 'फाउंटन ॲबीला' जायला हवं!'' सोबत त्यानं आमच्या गेल्या वर्षीच्या सहलीचे दोन *फोटोदेखील* पाठवले. फाउंटन ॲबीच्या आवारात, तिथे बहरलेल्या *स्नोड्रॉप्सच्या* पुढ्यात ते फोटो काढलेले होते. ते फोटो काढताना क्रिस्टिनानं तिच्या देशात रोमेनियात, लहानपणी ऐकलेली गोष्ट आम्हाला सांगितली होती. *मार्च महिन्याच्या पहिल्या दिवशी 'वसंतदेवता' वनविहार करत होती. निष्पर्ण झाडांच्या फांद्यांवर, खोडांवर, जमिनीवर – सगळीकडे बर्फच बर्फ होता. बर्फात एका ठिकाणी तिला एक 'स्नोड्रॉप-फूल' दिसलं. बर्फात पडलेल्या भेगेतून वर येण्याची त्याची धडपड सुरू होती. फुलाला मदत करावी या उद्देशाने वसंतदेवतेने आपल्या शक्तीने अलगदपणे फुलाभोवतीचा बर्फ वितळवला. ते पाहून 'हिवाळ्याची देवता' संतापली. तिनं थंड वाऱ्याचा फटकारा मारून स्नोड्रॉपचं फूल गोठवून टाकलं. वसंतदेवतेनं फुलाला उष्णता देण्यासाठी, त्याचा जीव वाचविण्यासाठी त्याभोवती आपल्या हातांचं आळं केलं. त्यावर हिवाळीदेवतेने वसंतदेवतेचे हातच थिजवून टाकले. वसंतदेवतेच्या थिजलेल्या हातांची त्वचा फाटली. तिच्या रक्ताचा एक थेंब स्नोड्रॉपवर ओघळला अन् त्यात जीव आला. फूल पुन्हा उमलल्याचं पाहून हिवाळीदेवतेनं माघार घेतली. हिवाळा सरला; वसंत आला! आणि तेव्हापासून स्नोड्रॉप्सचं फुलणं म्हणजे वसंताचं आगमन मानलं जाऊ लागलं.*

जेवणाच्या सुटीत मी गेल्या महिन्यात मागवलेलं पुस्तक उघडलं. अँड्र्यू ब्रॅन्सन यांचं 'वाईल्ड फ्लॉवर्स ऑफ ब्रिटन अँड युरोप'. त्यातलं *स्नोड्रॉप्सचं* पान शोधलं. सुंदरशा चित्राशेजारी एक ओळ छापली होती, 'जमिनीलगत उगवणारी कंदकुळातील वनस्पती.

**जाणून घ्या : मलबार बोटॅनिकल गार्डन (केरळ)** – या गार्डनमध्ये जलीय वनस्पतींच्या प्रजातींचा सर्वात मोठा संग्रह आहे.

वार्षिक देणगीदार - ➢ वैद्य घनश्याम खांडेकर, सासवड, जि. पुणे ➢ श्री. जगजीत कुलकर्णी, चिंचवड, पुणे
➢ श्री. राहुल भिडे, पुणे ➢ श्री. अमित गोडबोले, पुणे - कै. प्रकाश गणेश गोडबोले स्मरणार्थ



जानेवारी ते मार्च महिन्यादरम्यान हिच्या नाजूक तरी धीट अशा रोपट्यांवर तीन पाकळ्यांची, देठांवर गोठलेल्या हिमाच्या थेंबांसारखी दिसणारी, झुकलेली शुभ्र सफेद फुले उमलतात.'

'नाजूक तरी धीट!' वा! ब्रॅन्सनबुवांच्या शब्दनिवडीचं खास कौतुक वाटलं.

दुपारी काम संपवून नेहमीपेक्षा लवकर निघालो. चर्चच्या चौकात सायकलवरून उतरलो. सायकल भिंतीला टेकवून उभी केली आणि *स्नोड्रॉप्सचा* सडा डोळ्यांत, मनात सामावून घेऊ लागलो. सूर्य अस्ताला जात होता. वाराही शांत होता. सकाळसारखे जोरदार थंड झोत येत नव्हते. थंड पण मंद झुळुकी वाहत होत्या. त्यावर सूर्याच्या उरल्यासुरल्या प्रकाशात *स्नोड्रॉप्सची* झुंबरं डोलत होती. मी एका थडग्याच्या डोक्याशी बसलो. भरपूर फोटो काढले. घरच्यांना, मित्रमैत्रिणींना पाठवले- 'वसंतऋतू येत आहे!'

अंधार होऊ लागला तसा चर्चच्या भिंतीवरचा दिवा आपसूक पेटला. सायकल काढताना भिंतीलगत गवताचे आणखी काही पुंजके प्रकटलेले दिसले - *स्नोड्रॉप्सपेक्षा* लांब आणि जाड पाती, त्यातून वर आलेले देठ आणि देठांवर येऊ घातलेली हिरवी-पिवळी कळी. 'डॅफोडिल्स!' मन एकदम उचंबळून आलं. 'पण अजून वेळ आहे. वाट पाहावी लागणार. तरी हरकत नाही, तोवर तुमची सोबत आहेच की!' म्हणत मी *'स्नोड्रॉप्स'*चा निरोप घेतला.

❃❃

**- प्रसाद सांडभोर**

sandbhorprasad@gmail.com

## काव्य कोडी

१) वसंत ऋतुला हाच
बोलावून घेतो
वर्षाच्या कालगणनेला
सुरुवात करून देतो

गुढीपाडवा करतो हा
झोकात साजरा
कोणता मराठी महिना
हा साजिरागोजिरा?

२) पांढरा व लाल
याच्या दोन जाती
अंगावर याच्या
शेतातली माती

पापुद्र्यावर पापुद्रे
अंगावर चढवतो
पापुद्रे काढताच
कोण बरं रडवतो?

(उत्तर : १) चैत्र २) कांदा)

# अनुभव पक्षिनिरीक्षणाचा

– कु. काव्या ठाकूर



प्राणी, पक्षी, झाडं यांच्या निरीक्षणासाठी आम्ही ताम्हिणी घाटात जायचं ठरवलं. 'ताम्हिणीमध्ये काय असेल? काय बघायला मिळेल? राहायची सोय कशी असेल?' असे अनेक प्रश्न तेव्हा मनात येऊन गेले.

अखेर आम्ही ताम्हिणी घाटातील 'गरुडमाची'ला पोहोचल्यावर जेवण करून Hiding (प्राणी, पक्षी निरीक्षणासाठी लपून बसण्याची जागा) कुठं आहे, कसं आहे ते पाहून ठेवलं. आजूबाजूच्या झाडांची माहिती घेण्यासाठी आम्ही गरुडमाचीच्या परिसरात फेरफटका मारायला निघालो. आमच्या सोबत विनूदादा होते. *बटरफ्लाय ट्री*, रामअबोली, कुंभा, भुव चांदवा, दातपडी, निर्गुडी, ऐन, कोकम, आंबोळी, शेवडी अशा अनेक झाडांची माहिती आम्ही घेतली.

इतक्या वेगवेगळ्या प्रकारची झाडं बघून आम्ही सगळेच भारावून गेलो होतो. सहज मनाला वाटून गेलं की, चार झाडं माहिती असली, तरी आपण म्हणतो आम्हाला सगळी झाडं ओळखता येतात. पण एकदा तरी निर्सगाच्या सान्निध्यात जाऊन त्याच्याशी संवाद साधायला हवा.

वाटेत जाता–जाता 'पायगोडा मुंग्यां'चं छानसं वारूळ पाहायला मिळालं. विशेष म्हणजे या मुंग्या झाडावर वारूळ बांधतात. संध्याकाळ व्हायला सुरुवात झाली, तसे आमचे पाय Hiding च्या दिशेने वळले. आमचे कॅमेरे सज्ज झाले आणि डोळे आजूबाजूला पाहू लागले. १५ – २० मिनिटांतच एक सुंदर पांढरा शुभ्र पक्षी नजरेस पडला. डोळ्यात साठवून घेऊन पटकन जमतील तसे त्या पक्ष्याचे *फोटो* काढून घेतले. त्या पक्ष्याचं नाव होतं 'स्वर्गीय नर्तक.' खरंच त्याच्या नावानुसार, तो आमच्यासमोर इकडून तिकडे फिरत होता. जणू काही त्याचं नृत्यच तो आमच्यासमोर सादर करत होता. तेवढ्यात दुसऱ्या एका पक्ष्याचा आवाज आला, तसं आमचं लक्ष त्यानं वेधून घेतलं. जरा वेळातच तो पक्षी समोर आला तसे आम्ही पटकन त्याचे *फोटो* काढून घेतले आणि तो पक्षी उडाला. तो पक्षी होता 'निळ्या डोक्याचा कस्तुर.' आम्ही आणखी पक्षी येण्याची वाट पाहू लागलो. हे सगळे पक्षी बघून आमच्यासमोर पक्षी विविध गुणदर्शन सादर करताहेत असं वाटलं. संध्याकाळी आम्ही नाश्ता करायला गेलो. नाश्ता करताना विनूदादांशी Hiding मध्ये काय दिसलं याबाबत चर्चा झाली आणि Night Trail ला जायचं सुद्धा ठरलं. आम्ही लगेच तयार होऊन आलो. सोबत सुभाषदादासुद्धा होते. त्या दोन्ही दादांना निसर्गाविषयी इतकी माहिती होती आणि त्यांचे डोळे इतके तीक्ष्ण होते की, कोपऱ्यात बसलेला छोटासा पक्षीही त्यांना अगदी सहज दिसायचा. सुभग, नारंगी डोक्याचा कस्तुर, शिपाई बुलबुलची जोडी आणि Bamboo Pit Viper नावाचा साप इतके छान झोपले होते की, अगदी रात्रभर जरी त्यांच्याकडे बघायला



वार्षिक देणगीदार - ➢ श्री. ओंकार चांदोरकर, कॅनडा ➢ श्री. अमित गद्रे, पुणे
➢ श्री. सौरभ फाटक, डोंबिवली ➢ श्री. धनंजय कराडे, सासवड


निळ्या डोक्याचा कस्तुर

सांगितलं असतं तरी आम्ही थांबलो असतो.

एका मोकळ्या जागेत थांबून चंद्राच्या मंद आणि शांत प्रकाशात आम्ही डोळे बंद करून ती शांतता मनात साठवून घेतली. दिवसभराचा सगळा थकवा अगदी एका क्षणात निघून गेला. आम्ही खोलीवर परत आलो. खोलीवर परतताना Barking Deer चा आवाज ऐकू आला. दुसऱ्या दिवशी Barking Deer चं प्रत्यक्ष दर्शनही झालं. Nature Trek च्यावेळी भरपूर झाडांची माहिती आणि शास्त्रीय नावं कळाली.

सुभाषदादासुद्धा सतत आम्हाला काहीतरी नवीन सांगायचे आणि ती माहिती ऐकून आम्ही प्रत्येक क्षणाक्षणाला प्रेरित होत होतो. त्यामुळे आमचं पुढचं पाऊल सावध आणि एका नवीन उमेदीचं होतं. दातपडी (gingia glasuki), सोनकी (sensiograhmi), दायटी, उंबर, अंजनी, मुरुड शेंग, तेरडा (Impessionlavi) ही झाडं जरी आदल्या दिवशी पाहिली असली, तरी आत्ता त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा झाला होता. त्या झाडांमध्ये काहीतरी वेगळं पाहण्याचा आम्ही प्रयत्न करत होतो.

आम्ही देवराईमध्ये पोहोचताच माकडांनी आमचं चांगलंच स्वागत केलं. एक माकड आमच्यावर धावून आलं, जणूकाही तो आम्हाला धमकीच देत होता की, 'आमच्या प्राण्यांच्या राज्यात कशाला येऊन आम्हाला त्रास देता, आमचं जीवन, आमची झाडं का उद्ध्वस्त करता.' त्याला बघून आम्ही जरा घाबरलोच; पण सोबत सुभाषदादा होते त्यांनी त्या माकडाला काठी दाखवून पळवून लावलं. रक्तचंदनाच्या झाडांनी भरलेल्या या देवराईत आजूबाजूला कचरा पण भरपूर होता. देवाच्या वनात इतका कचरा कसा असू शकतो? आधुनिकीकरणाच्या नावाखाली तिथे *सिमेंटचे* रस्ते तयार झाले आणि झाडांना, प्राण्यांना, पक्ष्यांना त्रास देण्याचा, परिसर खराब करण्याचा परवानाच जणू मानवाला मिळाला. त्यामुळे कितीतरी प्राणी, पक्षी नष्ट व्हायच्या मार्गावर आहेत.

संध्याकाळी आम्ही सूर्यास्त पाहायला गेलो. तिथे खेकड्यांची भरपूर बिळे होती. त्यांना 'मान्सून खेकडा' असंही म्हणतात. आदिवासी लोकांचं हे आवडतं खाद्य असतं. हे खेकडे फक्त पावसाळ्यात बाहेर पडतात म्हणून इतर ऋतूत आदिवासी स्त्रिया पावसाचा आवाज काढून खेकड्यांना बाहेर यायला भाग पाडतात आणि पकडतात.

सूर्यास्त झाला आणि आमची निघायची वेळ झाली. खरंतर, एवढ्या निसर्गरम्य वातावरणातून आम्हाला मुक्कामाच्या ठिकाणी जायची इच्छाच होत नव्हती. त्या रात्री आम्ही जड मनानेच झोपलो. दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठून मी, श्वेतलताई, अनिरुद्धसर, अदितीताई आम्ही Hiding मध्ये गेलो. आम्हाला त्या दिवशी एकही पक्षी दिसला नाही. तरी आम्ही आशा सोडली नाही. तास-दीड तास झाला, तरी कोणताही पक्षी येईना. *ओडोमास* लावूनही डास काही आम्हाला

**जाणून घ्या : राष्ट्रीय निवडुंग आणि रसाळ बोटॅनिकल गार्डन (हरियाणा)** - या गार्डनमध्ये ३,५०० हून अधिक निवडुंगाच्या प्रजाती आहेत.

वार्षिक देणगीदार - ➢ श्री. सौमित्र जोशी, पुणे ➢ श्री. अनिल भिडे, पुणे ➢ श्री. माधव जोशी, पुणे

सोडत नव्हते. शेवटी कंटाळून आम्ही खोलीकडे जायला निघालो तेवढ्यात अनिरुद्धसर आले आणि म्हणाले, ''चला मी आलोय ना, आता भरपूर पक्षी दिसतील.'' आम्ही परत Hiding मध्ये गेलो आणि खरंच पक्ष्यांची आंघोळीसाठी रांग लागली होती. अनिरुद्धसरांची *कॅमेऱ्याची बॅटरी लो* झाली आणि श्वेतलताईंच्या *कॅमेऱ्याला* श्वासाचंही *व्हायब्रेशन* चालत नाही. कसेबसे जमतील तेवढे *फोटो* काढले. श्वेतलताईंना *फोन* करावा तर पक्षी उडून जातील आणि नाही करावा तर पक्ष्यांचे *फोटो* येणार नाही. पक्ष्यांना त्रास नको व्हायला म्हणून जमतील तसे *फोटो* काढून समाधान मानलं. पण खरंच अनिरुद्धसरांनी धीर दिला नसता, तर कितीतरी गोष्टी अनुभवायच्या राहिल्या असत्या. 'पक्षी निरक्षणामध्ये संयम हा गरजेचा असतो,' हा फार मोठा बोध त्यामधून झाला. तसेच पक्ष्यांचे *फोटो* आणि *व्हिडिओ* बघून पक्ष्यांची शिस्त लक्षात आली. एवढी शिस्त की, एकाची आंघोळ पूर्ण झाल्याशिवाय दुसरा पक्षी पुढे येत नाही, रांगेतच पक्षी पुढे-पुढे सरकायचे...! किती शिकण्यासारखं असतं निसर्गाकडून. त्यांचं ते आयुष्य खूप छान जगत असतात. आपण मदत करण्याच्या नावाखाली त्यांच्या सुंदर आयुष्यात लुडबुड करतो आणि त्रास देतो. आज जे काही निसर्गाकडून घेता येईल, शिकता येईल ते सगळं आम्ही शिकून घेत होतो आणि आचरणात आणण्याचा प्रयत्न करत होतो.

रात्री Night Trail ला जरा वेगळ्या रस्त्यानं जायचं ठरलं. तिथं काही फारसे पक्षी दिसले नाहीत; पण भरपूर शांतता अनुभवली. चंद्राच्या आणि चांदण्यांच्या प्रकाशाने ती जागा उजळून निघाली होती. कोणतेही पक्षी न दिसल्याने उदास मनाने आम्ही खोलीवरच जाणार होतो; पण म्हटलं आधी ज्या ठिकाणी पक्षी दिसले तेथे जाऊन बघू आणि काय आश्चर्य! ज्या झाडावर सुभग, नारंगी डोक्याचा कस्तुर झोपलेले बघितले होते, त्याच झाडावर त्याच पद्धतीने झोपलेले ते आज पण आम्हाला दिसले. किती अनोखं नातं असेल पक्षी आणि झाडांचं...! Bamboo pit viper हा साप पण झाडावर ज्या स्थितीमध्ये दिसला होता त्याच स्थितीमध्ये पुन्हा पाहायला मिळाला. क्षणभर असं वाटलं हे पक्षी, प्राणी दिवसभर त्याच झाडावर बसलेले असतील का? पण ते तसं नव्हतं. सकाळी जाऊन पाहिलं, तर यातलं कोणीच त्या ठरावीक जागांवर नाहीत, असं आढळलं. कसं बरं लक्षात ठेवत असतील ते?

आजची शेवटची रात्र घालवायची. घालवायची म्हणण्यापेक्षा मिळवायची. जेवढं निसर्गाचं निरीक्षण करता येईल, तेवढं करायचं असं ठरवलं. या विषयात आवड भरपूर होती; पण माझी माहिती चार-पाच पक्षी किंवा झाडांपुरतीच मर्यादित होती. त्याला छोटंसं वळण मिळालं ते ताम्हिणीमुळे.

ताम्हिणीत विशेष गोष्ट अशी झाली की, आम्हाला जंगल चालत अनुभवायला मिळालं. अर्थात इथे मोठ्या प्राण्यांची भीती नव्हती; पण एवढं नक्की की, जंगलाची माहिती, निसर्गाशी संवाद, पक्ष्यांचं, झाडांचं निरीक्षण हे ताम्हिणीत शिकायला मिळालं.

पण त्यासाठी फक्त आपले डोळे व कान तीक्ष्ण असले पाहिजेत, तर तुम्हाला हवे ते पक्षी अगदी सहज पाहता येतील. जर आपण निसर्गाला समजून घ्यायला लागलो, तर निसर्गपण आपल्याला समजून घेतो, आपल्याशी संवाद साधतो, फक्त तो संवाद आपल्याला समजायला हवा.

**- कु. काव्या ठाकूर** (इ. ९ वी)
गुरुकुल, ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय निगडी, पुणे

पुस्तकात भरपूर असतो, साठवलेला ज्ञानाचा ठेवा। प्रत्येक पुस्तकातून पेरला जातो, विचार नवा नवा।।
वार्षिक देणगीदार - ➢ श्री. रवींद्र पालेकर, पुणे ➢ श्री. हर्षवर्धन भावे, पुणे ➢ एक हितचिंतक, दिल्ली

## ज्ञान प्रबोधिनी, पुणे येथील विविध विभागांत बाल-कुमारांसाठी होणारी सुट्टीतील शिबिरे (एप्रिल-मे २०२३)

| शिबिराचे नाव | दिनांक/वेळ | वयोगट | तपशील व शुल्क |
|---|---|---|---|
| **१. रील मेकिंग** | १२ ते १४ एप्रिल<br>सकाळी ११ ते ४ | १६ ते २५ वर्षे | दिग्दर्शन, ध्वनिमुद्रण, लेखनकला इ.<br>**शुल्क : रु. १०००/–** |
| **२. गेम डेव्हलपमेंट** | १७ ते २२ एप्रिल<br>स. ११ ते ४ | १४ ते १८ वर्षे | गेम्स डिझाइन डेव्हलपमेंट<br>**शुल्क : रु. ४५००/–** |
| **३. एक मिनिट फिल्म मेकिंग** | २ ते १० मे<br>स. ११ ते ४ | १० ते १४ वर्षे | दिग्दर्शन व लेखनकला<br>**शुल्क : रु. ४०००/–** |
| **४. शॉर्ट फिल्म मेकिंग** | १५ ते २० मे<br>स. ११ ते ४ | १६ ते २५ वर्षे | दिग्दर्शन, लेखनकला, संकलन व ध्वनिमुद्रण<br>**शुल्क : रु. ४५००/–** |
| **संपर्क – शैक्षणिक साधन केंद्र :** शब्दाली काळे – ०२० २४२०७१२४/ ९०२८७६३८४० विद्या पोंक्षे –९९१६५११६०५ | | | |
| **१. विद्याव्रत संस्कार** | ३० एप्रिल ते ७ मे<br>११.३० ते ५.३० | १३ ते १५ वर्षे | विद्यार्थ्यांची वृत्ती घडवणे, प्रेरणा जागृत करणे<br>**शुल्क : रु. १५००/–** |
| **संपर्क – संवादिनी :** अर्चनाताई – ९७६७८४११४७/ विनयाताई –९९२३७९९७६९ | | | |
| **१. बालविकास शिबिर** | | | |
| **१. ऑफलाइन** | १ ते ७ मे, ८ ते १४ मे<br>१५ ते २१मे,२२ ते २८ मे<br>दु. १२ ते ५ | ७ ते १२ वर्षे | मुलांमधील विविध क्षमतांना चालना मिळणे<br>**शुल्क : रु. ४१३०/–** |
| **२. ऑनलाइन** | ८ ते १४ मे,२२ ते २८ मे<br>स. ११ ते २ | ७ ते १२ वर्षे | **शुल्क : रु. ३०४०/–** |
| **२. कुमारविकास शिबिर** | २९ मे ते ४ जून | १३ ते १६ वर्षे | **शुल्क : रु. ४१३०/–** |
| **संपर्क – प्रज्ञा मानस संशोधिका :** ०२०–२४२०७११८/८३९०९९८२६३/८४०८८४१७२८ | | | |
| **स्व अभ्यास कौशल्य कार्यशाळा** | २२ ते २४ मे | इ. ८ वी ते १०वीचे विद्यार्थी | **शुल्क : रु. २५००/–** |
| **संपर्क – प्रज्ञा मानस संशोधिका :** योगिता मणियार – ०२०–२४२०७१४५/व्हॉटसॲप मेसेज : ९०२२७२५८२० | | | |
| **१. उन्हाळी विज्ञान शिबिर** | २४ ते २८ एप्रिल<br>सकाळी १० ते १ | इ. ८ वी परीक्षा दिलेले | **शुल्क : रु. ५९०/–** (जीएसटीसहित) |
| **२. त्रिमितीची किमया कार्यशाळा** | २४ ते २८ एप्रिल<br>दु. २ ते ४ | इ. ७ वी ते ९ वी | **शुल्क : रु. ४७२/–** (जीएसटीसहित) |
| **संपर्क – शैक्षणिक उपक्रम संशोधिका :** ०२०–२४२०७२३१/ ९०२२४७६१४६/ सायली फडणीस – ९७६५९०२०४६ | | | |
| **१. प्रबोधन ऐपावाक**<br>(ऐका–पाहा–वाचा–करा) | १ ते ३१ मे | इ. ५वी ते ११वीचे विद्यार्थी | ऑनलाइन रोज २ लिंक्स् पाठवल्या जातील<br>**वर्गणी : रु. २००/–** |
| **संपर्क – छात्र प्रबोधन :** ०२०–२४२०७१७४/ www.jpprakashane.org | | | |
| **१. क्रीडा शिबिरे** | एप्रिल–मे | इ. ५वी ते १०वी मुलांसाठी | **संपर्क – युवक विभाग**<br>प्रथमेश – ९७६३०५४३४८<br>ही शिबिरे युवक विभागातर्फे होतील. |
| **२. विज्ञान कृतिशिबिरे** | एप्रिल शेवटचा आठवडा | इ. ५वी ते १०वी मुलांसाठी | हृषिकेश – ८२०८५३५४५३ |
| **३. विज्ञान प्रकल्प शिबिरे** | | इ. ८वी ते १०वी मुलांसाठी | |
| **युवती विभागातर्फे शालेय मुलींसाठी सुट्टीत शिबिरे होतील. संपर्क :** प्रज्ञाताई – ८९८३४०१५०७/स्वप्नालीताई ८८४७७९८९५२ | | | |

**अधिक तपशिलासाठी कृपया वरील संपर्क क्रमांकांवर ११ ते ५ या वेळात (सुट्टीचे दिवस सोडून) संपर्क करावा/व्हॉटसॲप संदेश पाठवावा.**

**जाणून घ्या : आचार्य जगदीशचंद्र बोस इंडियन गार्डन (प. बंगाल)** – या गार्डनमध्ये जगातील सर्वात मोठा वटवृक्ष येथे आहे.

वार्षिक देणगीदार - ➢ श्री. मुकुंद भास्कर कुवर, बोरीवली, मुंबई ➢ श्री. किरण सावरगावकर, पुणे ➢ श्री. संदीप धांडे, पुणे ➢ श्री. केदार वसंत जोशी, पुणे ➢ मुद्देबिहाळकर परिवारातर्फे हार्दिक शुभेच्छा!

# ‘प्रबोधन विकासिका’ योजना २०२३–२४ – वर्ष चौथे

- **कोणासाठी :** **इ. ५ वी ते ९ वी च्या धडपडणाऱ्या मुलामुलींसाठी ऑनलाइन–ऑफलाइन उपक्रम**
- **स्वरूप :**
  - **स्वयंविकासाला पूरक साहित्य**
  - १० दर्जेदार पुस्तके, ५ विशेषांक, वर्षभर छापील मासिक अंक, कुमारांसाठीची २०२४ ची दिनदर्शिका मिळणार.
  - **सुट्टीतील ऐपावाक उपक्रम** – यात मोफत सहभाग
  - वर्षभरात कला, विज्ञान–तंत्रज्ञान,संशोधन, वैद्यकीय, क्रीडा, सामाजिक क्षेत्रांतील **६ कर्तृत्ववान व्यक्तींशी ऑनलाइन गप्पा**
  - अभ्यास कौशल्ये, निर्णय, जीवन कौशल्ये, विकासाचे विविध पैलू इ. वर **एक दिवसीय प्रत्यक्ष २ कौशल्य विकसन कार्यशाळा**
  - एक दिवसीय **सहल**




- **कालावधी :** **मे २०२३ ते मार्च २०२४**
- **माध्यम : मराठी** (शंका–समाधान मराठी–इंग्रजी मिश्र माध्यमात)
- **वर्गणी :** **वार्षिक वर्गणी रु. ५०००/– २० एप्रिलपर्यंत सवलतीत रु. ४०००/–**

**प्रबोधन विकासिका, ऐपावाक व संवादक योजनांची आजच jpprakashane.org वर ऑनलाइन नोंदणी करा!!**

## सुट्टीतील ‘प्रबोधन ऐपावाक’ मे २०२३ - वर्ष चौथे

*(ऐका, पाहा, वाचा, करा)*

धमाल सुट्टीची! संधी अनुभवसंपन्न होण्याची!

**कालावधी : १ ते ३१ मे २०२३, वर्गणी रु. २००/-**

**मराठी वाचू, समजू शकणाऱ्या, इ.पाचवी ते अकरावीच्या विद्यार्थ्यांसाठी**

- **ऑनलाइन–ऑफलाइन संयुक्त,** WhatsApp **द्वारा रोज दोन दुवे**
- **ऐ–पा–वा** (पैकी रोज एक) **: कथा, कविता, ललित, स्फूर्तिगीते, प्रेरक कहाण्या, विकसनपर लेख, कल्पकतेचे पैलू आणि बरंच काही...**
- **‘करा’** (२० दिवस रोज एक दुवा) **: भन्नाट खेळ, प्रयोग, कल्पक कलाकृती, उत्साहवर्धक व्यक्ति–जोडीकार्ये, व्यवहारज्ञानावरील कृती**
- **नावीन्यपूर्ण स्पर्धा आणि आकर्षक बक्षिसेही!!**
- **२ कर्तृत्ववान व्यक्तींसोबत ऑनलाइन गप्पा**
- **उत्तम सहभाग घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी शेवटी एक दिवसाची सहल**

## पालकांसाठी - ‘प्रबोधन संवादक’ योजना २०२३-२४- वर्ष दुसरे!

**आपल्या पाल्याला प्रबोधिनीच्या शैक्षणिक प्रक्रियांचा लाभ डोळसपणे करून देण्यासाठी उत्साही व सजग पालकांसाठीचा विशेष उपक्रम!**

**या योजनेअंतर्गत...**

- १० पुस्तके, वर्षभर छात्र प्रबोधन इ–मासिक, छापील दिवाळी अंक व संग्राह्य दिनदर्शिका
- एक दिवसीय २ कार्यशाळा (प्रत्यक्ष), मासिक ऑनलाइन व्याख्याने व गप्पांचे ८ कार्यक्रम
- विचार–अनुभवांची देवाणघेवाण यासाठी व्हॉटस्‌अ‍ॅप गट.
- पालक–विद्यार्थ्यांसाठी प्रबोधिनीच्या विविध उपक्रमांची माहिती वेळोवेळी पाठवली जाईल.

**वार्षिक वर्गणी रु. ५०००/– सवलतीत रु. ४०००/–**

**प्रबोधन विकासिका व संवादक या दोन्ही योजनांसाठी एकत्रित नोंदणी केल्यास सवलतीतील वर्गणी रु. ७०००/–**

**(सर्व सवलती दि. २० एप्रिल २०२३ पर्यंत लागू)**

सौर चैत्र, शके १९४५/एप्रिल २०२३ पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan
प्रकाशन दिनांक : सौर ११ चैत्र, शके १९४५/१ एप्रिल २०२३
पंजीकरण क्रमांक (RNI NO.) MAHMAR /2000/5636 घोषणापत्र क्रमांक : (SDM/Pune/SR/139/2017)
टपालाने सवलतीच्या दरात पाठविण्याचा परवाना क्रमांक : PCW/050/2021-2023
Date of posting : On 1st day of every month, At the Post office S. P. college, Pune - 30. Date of publication : 1-4-2023



**कुमारांच्या कुंचल्यातून साकारलेले चित्र!**

– **कु. श्रावणी माने** (इ. ५ वी), आत्माराम विद्यामंदिर, ओगलेवाडी–कराड

**सौर दिनदर्शिका शके १९४५**

| | सौर चैत्र वैशाख | एप्रिल २०२३ |
|---|---|---|
| श. | चै.११ | 1 |
| र. | १२ | 2 |
| सो. | १३ | 3 |
| मं. | १४ | 4 |
| बु. | १५ | 5 |
| गु. | १६ | 6 |
| शु. | १७ | 7 |
| श. | १८ | 8 |
| र. | १९ | 9 |
| सो. | २० | 10 |
| मं. | २१ | 11 |
| बु. | २२ | 12 |
| गु. | २३ | 13 |
| शु. | २४ | 14 |
| श. | २५ | 15 |
| र. | २६ | 16 |
| सो. | २७ | 17 |
| मं. | २८ | 18 |
| बु. | २९ | 19 |
| गु. | ३० | 20 |
| शु. | वै. १ | 21 |
| श. | २ | 22 |
| र. | ३ | 23 |
| सो. | ४ | 24 |
| मं. | ५ | 25 |
| बु. | ६ | 26 |
| गु. | ७ | 27 |
| शु. | ८ | 28 |
| श. | ९ | 29 |
| र. | १० | 30 |

**सभासदांनी आपले व्हॉटस्अ‍ॅप संपर्क क्रमांक कळवले नसल्यास ९०११११६१४४५ या भ्रमणभाषवर लवकरात लवकर कळवावे. म्हणजे सभासदांशी वेळोवेळी संपर्क साधता येईल. स्पर्धा, उपक्रम, व्याख्याने, नवीन प्रकाशने यांची माहिती पोहाचवता येईल.**

**सौर दिनदर्शिकेचा वापर जरूर करा.**

**संपर्क पत्ता :**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (020) 24207 174/175
www.chhatraprabodhan.org
**इ–मेल :** chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

**वार्षिक वर्गणी : ₹ २५०/–**
ऑनलाइन वर्गणी भरण्यासाठी व पुस्तक खरेदीसाठी :
**www.jpprakashane.org**

**प्रिय पोस्टमन,**

हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करत आहात. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना!

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (→) पत्त्यावर द्यावे.

तुमचा–संपादक, छात्र प्रबोधन